www. sahyandrinews.com

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

होळी पेटू दे
रंग उधळू दे
मतभेद मिटू दे
प्रेमच प्रेम सर्वत्र बहरू दे

होळीच्या

सर्वांना हार्दिक शुभेच्छा....!

–संपादक

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७४ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२४ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## महायुतीचे जागावाटप ठरेना

# बारामती,माढा,अमरावतीस अनेक लोकसभा मतदार संघांत वाद,इच्छुकांची मनधरणी करताना नेतृत्व गार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची लगबग सुरू झाली आहे. पण अद्याप सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीतील जागा वाटपाचा तिढा सुटला नाही. महायुतीत बारामती, माढा, अमरावती व सोलापूरसह अनेक मतदार संघांवर माथापच्ची सुरू आहे. या मतदार संघांत तिकिट एक अन् इच्छुक अनेक अशी स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी महायुतीतील घटकपक्षांच्या नेत्यांची इच्छुकांची मनधरणी करताना नाकीनऊ येत आहेत.

बारामती लोकसभा मतदार संघातही महायुतीपुढे आव्हान निर्माण झाले आहे. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. पण येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी पवार यांच्याविरोधात बंडाचे निशाण फडकावले आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी समजूत काढल्यानंतरही शिवतारे आपली तलवार म्यान न करण्याच्या बेतात असल्यामुळे अजित पवार हैरान झालेत. त्यातच भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनीही अजित पवारांविरोधात दंड थोपटण्याचे संकेत दिलेत. यामुळेही अजित पवारांची डोकेदुखी वाढली आहे.माढा लोकसभा मतदार संघात भाजपने रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पण त्यांच्या उमेदवारीला रामराजे निंबाळकर व मोहिते पाटील यांच्या गटाने कडाडून विरोध केला आहे. या दोन्ही नेत्यांनी उमेदवार बदलण्याची मागणी केल्यामुळे भाजपची अडचण वाढली आहे.अमरावती लोकसभा मतदार संघातही भाजपपुढे नाराजींची नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान उभे टाकले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मतदार संघात विद्यमान सहकारी खासदार नवनीत राणा यांना उमेदवारी देण्याचे संकेत दिलेत. पण स्थानिक भाजप नेत्यांनी त्याला विरोध



दर्शवल्यामुळे राणा यांचे कमळाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याचे स्वप्न भंगण्याची स्थिती निर्माण झाली आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे सोलापूर लोकसभा मतदार संघातही उमेदवार ठरवताना भाजपपुढे अडचण निर्माण झाली आहे. एवढेच नाही तर साताऱ्यातही अशीच परिस्थिती उद्भवण्याची चिन्हे आहेत. गत काही दिवसांपासून साताऱ्याच्या उमेदवारीवर पक्षात धीरगंभीर चर्चा सुरू आहे. या मतदार संघावर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने दावा केला आहे. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेही ही जागा मागितली आहे. त्यातच भाजप खासदार उदयनराजे भोसले यांनी उमेदवारीसाठी गत २ दिवसांपासून राजधानी नवी दिल्लीत तळ ठोकल्यामुळे या ठिकाणी पेच वाढला आहे. या सर्व परिस्थितीतून मार्ग काढताना भाजप नेत्यांची दमछाक होत आहे.दुसरीकडे, नाशिकच्या जागेवरूनही महायुतीच्या घटकपक्षांत रस्सीखेच सुरू झाली आहे. महायुतीत ही जागा शिवसेनेकडे आहे. पण आता ही जागा भाजप व राष्ट्रवादीलाही हवी आहे. ही स्थिती रामटेक कोल्हापूर व रत्नागिरी – सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघामध्ये सुद्धा दिसून येत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघात भाजपकडून केंद्रीय मंत्री नारायण यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. पण याविषयी अद्याप स्थिती स्पष्ट झाली नाही. कहर म्हणजे अजित पवार गटाने धाराशिव, गडचिरोली, सातारा या जागांवरही भाजप व राष्ट्रवादीने दावा केल्याची चर्चा आहे. यामुळेही अडचण वाढली आहे.

## विद्युत करंटने ग्रा.पं. शिपायाचा मृत्यू

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड पोलिस स्टेशन अंतर्गत येतं असलेल्या घोडाझरी येथील नारायन चौधरी (वय ५० वर्ष) यांचा (ता.२१ ) ला ३.३० वाजताचे दरम्यान विद्युत करंटने मृत्यू झाल्याची घटना घडली.

गोविंदपूर गटग्रामपंचायत अंतर्गत येतं असलेल्या घोडाझरी येथिल ग्रामपंचायतचा शिपाई असलेला नारायन चौधरी हा या परिसरातील विद्युत दुरुस्ती चे काम करायचा. घोडाझरी हा परिसर जगंलव्याप्त असल्याने या परिसरात विद्युत विभागांचे कर्मचारी विज दुरुस्तीचे काम करण्यासाठी वेळेवर जात नसल्यानें ग्रामपंचायतीच्या कामासोबत विद्युत दुरूस्तीचे काम करायचा आज तळोधी पाणीपुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा खंडित झाल्याने घोडाझरी तलावापासुन अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या विद्युत पोलवर चढुन डिओ टाकत असतांना विद्युत करंटचा झटका लागल्याने मृत्यू झाला. विद्युत पुरवठा बंद असतांनाही विद्युत करंट लागला कसा? हा प्रश्नच पडला असुन विद्युत विभागाबद्ल जनतेत रोष व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती नागभिड पोलिसांना मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. विद्युत पोलवर अटकून असलेला नारायन चौधरी यांचा मृत्यूदेह काढुन शवविच्छेदन करण्यासाठी नेमण्यात आले असुन पुढील तपास नागभिड पोलीस करीत आहे.

## आयटीआय मधील निरुपयोगी साहित्याचा ३ एप्रिल रोजी लिलाव

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागभीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) येथे व्यवसायातील निरुपयोगी कालबाहय झालेली निर्लेखित संयत्रे साहित्य उपकरणे असून आहे त्याच अवस्थेत विक्री करण्यात येत आहे. या करिता ३ एप्रिल २०२४ रोजी दुपारी १ वाजता लिलाव आयोजित करण्यात आला आहे.इच्छुक निर्लेखित साहित्य खरेदीदारांनी लिलावात सहभागी होण्यासाठी शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्था, एम. आय. डी. सी. परिसर, नागभिड येथे अधिकृत लेख्यासह उपस्थित राहावे, असे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य आर.एम.डांगे यांनी कळविले आहे.

## अन् ग्रामीण रुग्णालयातील मद्यधूंद डॉक्टरांना जेलवारी

### पुलगाव येथील धक्कादायक प्रकार;वैद्यकीय अधिकारी धमाने,राऊत यांना अटक

### भीम आर्मीचे अंकुश कोचे यांच्या तक्रारीवरून मद्यपी डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुलगांव । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्याच्या पुलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात शुक्रवारी रात्री कोणतेच डॉक्टर उपस्थित नव्हते.डॉक्टर उपलब्ध नसल्याची बाब भीम आर्मीचे अंकुश कोचे यांच्या निदर्शनास येताच त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांशी संपर्क साधून वर्धेतून डॉक्टरांना बोलावले. शल्यचिकित्सकांच्या सांगण्यावरून वर्धा येथून दोन डॉक्टर पुलगाव ग्रामीण रुग्णालयात पोहचले. मात्र, ते दोन्ही डॉक्टर मद्यधुंद अवस्थेत होते. मद्यधुंद अवस्थेत त्यांनी रुग्णाला तपासायला सुरवात केली. दारूबंदी जिल्ह्यात दारू पिऊन रुग्ण तपासत असल्याच उपस्थितांच्या निदर्शनास येताच.अंकुश कोचे यांनी पुलगाव पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी दोन्ही मद्यधुंद डॉक्टरांना बेड्या ठोकून कार जप्त केली. डॉ. प्रवेश प्रतापसिंग धमाने रा. यशवंत कॉलनी वर्धा आणि डॉ. माणिकलाल राऊत रा. जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा, अशी अटक केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची नावे आहे.पुलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने एका वैद्यकीय अधिकाऱ्याच्या खांद्यावर रुग्णालयाचा डोलारा सुरु आहे. २२ रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास काही रुग्ण रुग्णालयात आले. वैद्यकीय अधिकारी नसल्याने तेथील परिचारिकेने मी गोळ्या देऊ शकत नसल्याचे सांगितले. याची माहिती अंकुश कोचे यांना मिळाली असता त्यांनी रुग्णालयात जात ही जिल्हा शल्यचिकित्सकांना फोनद्वारे कळविली. जिल्हा शल्यचिकित्सकांनी डॉ. धमाने आणि डॉ.



राऊत यांना वर्ध्याहून ग्रामीण रुग्णालयात पाठविले. दोन्ही डॉक्टर रात्री ९.३० वाजताच्या सुमारास रुग्णालयात मद्यधुंद अवस्थेत पोहचले. एका आठ वर्षीय मुलाला ताप आल्याने त्याची प्रकृतीही अत्यवस्थ होती. कोचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मद्यधुंद डॉक्टरांना उपचार करण्यास रोखले. पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी दोन्ही डॉक्टरांना पोलिस ठाण्यात नेत अटक करुन गुन्हा दाखल केला. डॉ. धमाने आणि डॉ. रुऊत हे दोघेही मद्यप्राशन करुन होते. ते एमएच.३२ वाय. ४०४३ क्रमांकाच्या कारने रुग्णालयात पोहचले होते. त्यांच्याकडून साधे बोलणे देखील होत नव्हते. रुग्णांनी डॉक्टरांची अशी अवस्था पाहून अशा डॉक्टरांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी रेटून धरली. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत कारची पाहणी केली असता कारमध्ये दारुची बाटली आढळून आली. पोलिसांनी दोघांना अटक करुन कारही जप्त केली. मद्यपी डॉ. प्रवेश धमाने याच्याविरोधात यापूर्वी देखील मद्यधुंद अवस्थेत रुग्णांवर उपचार केल्याच्या तक्रारी असल्याची चर्चा आहे. मद्यप्राशन करून असलेल्या डॉक्टरकडून मुलावर चुकीचा उपचार झाला असता तर याला जबाबदार कोण ठरले असते, त्यामुळे अशा मद्यपी डॉक्टरांवर कठोर कार्यवाही करण्याची गरज आहे.पुलगाव येथील रुग्णालयात मद्यधुंद डॉक्टर बाबत तक्रार प्राप्त झाली आहे. या डॉक्टरां बाबत आरोग्य संचालक आणि उपसंचालक यांना माहिती देण्यात आली असून तात्काळ कारवाईची मागणी केली असल्याच आमदार रणजित कांबळे यांनी सांगितलंय.दारूबंदी जिल्ह्यात दारूच्या नशेत रुग्णावर उपचार करणाऱ्या डॉक्टरच्या या कृत्याचा सगळीकडे निषेध केला जातं आहे.

## नागभीड येथील वीस महिलांचा काँग्रेसमध्ये प्रवेश



**चिमूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या ध्येयधोरणाला कंटाळून व भारतीय राज्यघटना वाचविण्यासाठी २३ मार्च रोज शनिवारला राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमुर विधानसभा क्षेत्र डॉ. सतिश वारजुकर यांच्या कुशल नेतृत्वावर विश्वास ठेवून नागभीड येथील सोनिया त्रिंबके, शुभांगी ताई भेंडारकर, वर्षा मसराम, निकिता मसराम, नीताताई मसराम, मेघा कोसे वनिता फटिंग, हर्षा मडकाम, लक्ष्मी बनकर, प्राजक्ता ठोंबरे, तृप्ती किरमकर दिपाली गिरडकर, पायल ठोंबरे, दीक्षा जुनगरे, रोशनी चन्नेकर, वैशाली मेश्राम, रेखा रामटेके, यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला. सतीश राजूरकर यांनी काँग्रेस पक्षाचा दुपट्टा टाकून त्यांचे पक्ष स्वागत केले. व त्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रामुख्याने चिमूर विधानसभा महिला अध्यक्ष नीतू गुरपुढे, प्रणया गड्डमवार, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष अश्विनी अमृतकर, एस सी सेल अध्यक्ष मंजुषा नारायणी, महिला शहराध्यक्ष सुनिता डोईजड, माजी नगरसेविका सारिका धारणे, नागभीड शहर युवती अध्यक्ष राणी येरणे, योगिता मिसार, नीलिमा भुरे, मला मुळे, आरती भोयर, सुवर्णा टिपले, शुभांगी भेडारकर तसेच महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.






'लहानपणा देगा देवा, मुंगी साखरेचा रवा'. मानवी जीवनात बालपण सर्वात चांगले असते. खेळताना सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना मस्तीत रमलेले बालगडी..छाया :प्रणय बांगरे.

## संघाच्या अध्यक्षपदी ॲड.मिलींद रायपूरे तर सचिवपदी ॲड.विजय मत्ते



**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुका अधिवक्ता सघाच्या दिनांक २२ मार्चला निवडणूक पार पडलेल्या निवडणुकीत ड. मिलिंद रायपूरे हे ४९ पैकी ३५ मते घेवून तालुका अधिवक्ता संघाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले तर ड. विजय मत्ते सचिव म्हणून निवडून आले.सदर निवडणूक प्रक्रियेत ड एम. आर. शेख यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम केले, तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून ड. किशोर धोटे, व ड. ओमप्रकाश चौधरी यांनी काम पाहिले. त्यांच्या या विजयाचे ड.उदय पलिकुंडवार, ड. भूपेंद्र रायपुरे, ड. प्राशिष ताठे, ड.कुणाल पथाडे, ड.सुनील नामोजवार, ड.अर्चना आगलावे, ड.राजू सपकाळ, ड. भडगरे, ड. कविश्वर चालखुरे व अन्य सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.


# शिमगा: फाल्गुन पोर्णिमा!

होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. होळी सण वसंत ऋतूतील धान्य कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. हा सण एक रात्र आणि एक दिवस चालतो, हिंदू कॅलेंडरप्रमाणे फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी सुरू होतो, जो ग्रेगेरियन कॅलेंडरमध्ये मार्चच्या मध्यभागी येतो.

फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण भारतामध्ये, विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते. होळी हा रंगाचा सण आहे. होळी या उत्सवाला होळी पौर्णिमा, होलिकोत्सव, होलिकादहन, अशी विविध नावे आहेत. होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. आता तर होळी खेळताना सेल्फी घेण्याचा आधुनिक पॅशन झाला आहे. पण हे धोकादायक ठरू शकते.

या उत्सवाला होलिकादहन किंवा होळी, शिमगा, हुताशनी महोत्सव, फाग, फागुन दोलायात्रा, कामदहन अशा वेगवेगळ्या संज्ञा आहेत. कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुन महिन्याच्या शेवटच्या दिवशी साजरा होणाऱ्या या लोकोत्सवाला फाल्गुनोत्सव आणि दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्त वसंतागमनोत्सव किंवा वसंतोत्सव असेही म्हणण्यात येते. देशी नाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणालाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच शिमगा असा अपभ्रंश तयार झाला असावा असे मानले जाते. होलिकादहन हे एका स्त्रिरुपाचे दहन करण्याची शिकवण देते, म्हणून जाणकारांनी या सणावर बहिष्कार घालण्याची मागणी रेटून धरल्याचे कळते. कारण एकीकडे स्त्रीला लक्ष्मी म्हणून पूजले जाते आणि येथे जाळले जाते. या दोन्ही कृतीत विसंगती आढळते.

महाराष्ट्रातील खेड्यांत होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळतात, पण हे योग्य नाही. त्याऐवजी काट्या, प्लास्टिक आणि अविघटनशील कचरा जाळावा. पेटलेल्या होळीभोवती बोंबा मारत लोक प्रदक्षिणा घालतात. त्यात अश्लील, अर्वाच्य शब्द उच्चारणे टाळले पाहिजे. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे. होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.



भारतातील शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे. पौराणिक इतिहास पाहता या सणाचे आणि कृष्ण–बलराम यांचे नाते दिसून येते. होळीच्या निमित्ताने या दोन्ही देवतांचे स्मरण आणि पूजा करतात. या दिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते, हे त्यामागील कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याचीही प्रथा आहे. लहान मुलांना पीडा देणाऱ्या होलिका, ढुंढा, पुतना यासारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नी जाळू शकणार नाही, परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे. अशाप्रकारे हिंदूंच्या इतर सणाप्रमाणे होलिकादहन देखील वाईटावर चांगल्याचा विजयाचे चांगले प्रतीक आहे. वाईट गोष्टींवर विजय मिळवणे ही या सणाची व्याख्या आहे. राधा आणि कृष्ण यांच्या प्रेमाचे वर्णन असणारे होळी सणाचे संदर्भ दिसून येतात. गर्गसंहिता या ग्रंथात कृष्णाने होळी साजरी केल्याचा उल्लेख आहे, असे मानले जाते. होळीच्या जोडीने रंग उधळून राधा, गोपी यांनी कृष्णासह रंगाचा उत्सव साजरा केला अशीही आख्यायिका प्रचलित आहे.!! होळी व धूलिवंदन सणाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## अमरावतीत भाजपचाच उमेदवार असणार

**मुंबई**–रामटेक लोकसभेची जागा शिवसेनेला जाणार आहे. तर अमरावती मतदारसंघ भाजपकडे असेल. अमरावतीत महायुतीचे सर्व भाजप उमेदवाराला पाठिंबा देतील. आम्ही सर्वांशी चर्चा करु. सर्व जागांवर चर्चा सुरू आहे. काही जागा भाजपला देखील सोडाव्या लागणार आहेत. बारामती आता राष्ट्रवादीकडे जाणार आहे. अशा अनेक जागा आहेत ज्या ठिकाणी आम्ही जिंकणार आहोत. काही ठिकाणी राष्ट्रवादी तर काही ठिकाणी शिवसेना जिंकू शकते, असे भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.दरम्यान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मोदींनी अनेक गरीब कल्याणाच्या योजना आणल्या आहेत. काँग्रेसचे ६५ वर्षे आणि मोदींची १० वर्षे याचा विचार केला तर मोदींच्या १० वर्षांच्या कार्यकाळात जास्त कामे झाल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

२ ते ३ दिवसात महायुतीमधील जागावाटपाचे चित्र स्पष्ट झालेले असेल, या पेक्षा जास्त वेळ जागावाटपासाठी लागणार नाही, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. आम्ही १३ पक्ष सोबत येत काम करत असून बुथवर लक्ष केंद्रीत करत आहोत, त्यातून आम्हाला ५१ टक्के मते मिळतील अशी अपेक्षा आहे, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

## लोकसभा ट्रेलर, खरा पिक्चर विधानसभेत दिसणार महायुतीला राज्यभर फटका देणार–महादेव जानकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणूक हा फक्त ट्रेलर असेल, खरा पिक्चर तर विधानसभेत दिसणार असा इशारा रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी दिले. तसेच भाजपने मला डावलल्याने सगळ्या ४८ लोकसभा मतदारसंघात भाजपला फटका बसेल असा दावाही त्यांनी केला आहे. भाजपकडून लोकसभा निवडणुकीत डावलले गेल्याने दुखावलेल्या महादेव जानकर यांना माढा लोकसभेतून शरद पवार यांनी उमेदवारी निश्चित केल्याची माहिती आहे. त्यानंतर त्यांनी भाजपला हा इशारा दिला आहे.

यावेळी बोलतांना ते म्हणाले, जो काही धनगर आणि ओबीसी समाज आमच्यामुळे भाजपसोबत होता, तो आता भाजपकडे पाठ फिरवताना दिसेल असे सांगताना लोकसभा हा तर ट्रेलर आहे, खरा पिक्चर विधानसभेला दिसेल असे जानकर म्हणाले. तसेच शरद पवार यांनी मला हेरले, विश्वास टाकला, त्याचा फायदा महाविकास आघाडीला होणार असून मी माझ्या रासप चिन्हावर लढणार असल्याचे देखील ते म्हणाले.पुढे बोलतांना ते म्हणाले, ''भाजपने आम्हाला मंत्रिपदाचा एक बैल दिला होता तो आम्ही भाजपकडे धनगर आणि ओबीसी समाजाची मते वळवून त्यांना परत केला होता. मात्र भाजपने आमचा आमदार फोडला, आम्हाला लोकसभेला जागा नाकारण्यात आली. त्यामुळे आता शरद पवार यांनी आम्हाला एक बैल दिला असून आता त्यांचा आणि आमचा बैल जोडून महाराष्ट्राची शेती फुलवणार'', अशा शब्दात जानकरांनी महायुतीला टोले लगावले.



तसेच ''भारत स्वतंत्र झाल्यापासून भाजप किंवा काँग्रेसने आजवर कधीही धनगर समाजाला लोकसभेत पाठवले नव्हते. मात्र शरद पवार यांनी पहिल्यांदा धनगर समाजाला ही संधी दिल्याने राज्यातला धनगर समाज शरद पवार यांना धन्यवाद देत आहे. आमच्यासाठी जे भाजपने केले होते त्याची आम्ही परतफेड केली असून आता आघाडीसोबत आम्ही असल्याने आमचा फायदा आघाडीला मिळेल'' असे जानकर म्हणाले.आता आमचा पक्ष संघटना आणि समाज यांनी मनावर घेतले असून माढ्यातून २ लाखांच्या फरकाने रणजित निंबाळकर यांचा पराभव करणार असल्याचा दावा जानकर यांनी केला. माढा लोकसभा मतदारसंघ शरद पवार मोहिते पाटील किंवा रामराजे निंबाळकर यांच्याकडे देतील असे राज्याला वाटत असताना शरद पवार यांनी रासप वर विश्वास दाखवला'', असे जानकर म्हणाले.

## जी चॅम्प अबॅकस च्या दिपाली पाटील यांना उत्कृष्ट उद्योजकता पुरस्काराने सन्मानित

**सांगोला । प्रतिनिधी**

जी चॅम्प अबॅकस च्या सांगोला शाखेच्या प्रमुख सौ दिपाली सोमनाथ पाटील मॅडम यांना Best online -bacus coaching institute in Maharashtra याने सन्मानित करून प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या शुभहस्ते यावर्षीचा उत्कृष्ट उद्योजकता पुरस्कार देण्यात आला.

हा पुरस्कार वितरण सोहळा नाशिक येथील एका भव्य सभागृहामध्ये संपन्न झाला. यामध्ये महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यामध्ये राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अबॅकस चे ज्ञान पोहोचवणारे अनेक क्लासेस उपलब्ध आहेत.त्यापैकी सांगोला येथील सौ दिपाली पाटील मॅडम यांच्या ज्ञानप्रबोधिनी जी चॅम्प अबॅकस ऑनलाइन क्लासमुळे महाराष्ट्राच्या दुर्गम भागातील गोर गरीब, सर्वसामान्य विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. या अनुषंगाने सौ. दिपाली सोमनाथ पाटील व श्री सोमनाथ पाटील यांच्या क्लासला बेस्ट ऑनलाइन अबॅकस कोचिंग इन्स्टिट्यूट इन महाराष्ट्र ने सन्मानित करून प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या शुभहस्ते या उभयतांना यावर्षीचा उत्कृष्ट उद्योजकता पुरस्काराने गौरवण्यात आले.त्यांच्या या यशाबद्दल समाजातील सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. सध्या अबॅकस चे ऑनलाईन क्लासेस बरोबर ऑफलाइन क्लासेस सांगोला येथील महात्मा फुले बी एड कॉलेज ( दुसरा मजला) येथे सुरू आहेत. ज्या इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांनी या ( ७४९९५२९८९४) दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.




## सांगोला नगरपरिषदेची धडक कारवाई थकबाकी दारांचे गाळे व मालमत्ता केले सिल

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला नगरपरिषदेमार्फत मागील दोन महिन्यांपासून कर वसुलीसाठी विशेष वसुली मोहीम हाती घेण्यात आली आहे. या विशेष वसुली मोहिमेअंतर्गत थकबाकीदारांना भाडे व कराच्या रक्कमा भरणेबाबत नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत वारंवार सूचना देण्यात येत आहेत. परंतु तरीदेखील थकीत भाडे व कराच्या रक्कमा भरणा न झालेने मा. मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचे मार्गदर्शनाखाली नगरपरिषद मालकीचे एकूण ७ गाळे थकीत भाडे व कराच्या रकमेपोटी सिल करण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विशेष वसुली मोहीम राबविण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून वारंवार आढावा व सूचना देण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून नगरपरिषद मालकीचे गाळे सील करण्यात आले. या मध्ये आरक्षण क्र.२७ आठवडा बाजार सेवा दुकाने गाळा क्र.१०,आरक्षण क्र.२७ आठवडा बाजार सेवा दुकाने गाळा क्र.११,आरक्षण क्र.२७, आठवडा बाजार सेवा दुकाने गाळा क्र.९,जि.प.शाळा आवार खुली जागा गाळा क्र.१९,जि.प.शाळा आवार खुली जागा गाळा क्र.२०,जि.प.शाळा आवार खुली जागा गाळा क्र.२५,जि.प.शाळा आवार खुली जागा गाळा क्र.३३ या मालमत्ता सील केलेल्या आहेत. सदरची कारवाई मा. मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचे मार्गदर्शनाखाली कार्या. अधीक्षक श्री. स्वप्निल हाके,लेखापाल श्री.धनाजी साळुंखे, सतीश बनसोडे, अश्वजित माने, अनिकेत चंदनशिवे, संजय गावडे, आनंद हुलजंतीकर, शरद चव्हाण, संतोष ठोकळे, योगेश रसाळ, संतोष जांगळे व रमेश मोरे यांच्या उपस्थितित करण्यात आली.थकबाकी रकमांच्या वसुलीसाठी नगरपरिषदेकडून वारंवार सूचना देऊनही थकबाकीच्या रकमा नभरणाऱ्यांकडील मालमत्ता सिल करण्यात येणार आहेत. तरी सर्व मालमत्ताधारकानी लवकरात लवकर कर भरणा करून नगरपरिषदेस सहकार्य करावे व कटू कारवाई टाळावी. असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे.



# होळी म्हणजेच वसंतोत्सव

प्राचीन भारतात होळीचा हा मनमोहक उत्सव वसंतोत्सवाच्या रुपाने साजरा होत असतो. वसंत ऋतुच्या आगमनाप्रसंगी निसर्गाने अधिकच साजश्रृंगार केलेला असतो. फुललेल्या फुलाला कोमलतेचा बहार आलेला असतो. झाडं पाना–फुलांनी नववधुगत बावरुन गेलेली असतात आणि पक्षाचं आकाशात झुलायचं स्वप्नही साकार झालेलं असतं. निसर्गाच्या तारुण्याचे हिरवेपण पाहून माणसाचं मन बहरुन आनंदून आलेलं असतं. वसंतोत्सव हा कालांतराने होळी दहनाच्या रुपाने साजरा होऊ लागला. उत्सवाचं स्वरुप जरी बदललं तरी उद्देश धोरण तोच आहे. प्रसन्नता, आनंद, मस्ती या दिवसात मन उचंबळून आलेलं असतं.मकामफविषयाला अधिकच ओंगळ नि अश्लील स्वरुप देऊन त्याचे गुण–गाण लोकांसमोर उभे करुन त्याच्याविषयी घृणा वाटावी हा उद्देश होळी या सणात मुख्य करुन आहे. वात्सायनाने या सणाच्या उत्सवाला मसुवसंतकफ असं म्हटलं आहे तर कवि भासाने मकामदेवानुयानफ असं नामकरण केलं आहे.



प्रभाकर सोमकुवर
नागपूर
मो.क्र.९५९५२५५९५२

होळी एक वैचारिक भाष्य

हिंदू धर्मात माणसांना जात असते इतकेच नव्हे तर देव, पशुपक्षी आणि सण यांना सुध्दा जात असते. तसा होळीचा सण हा जातीने शुद्र आहे, असं काकासाहेब कालेलकरांनी आपल्या मगुलामांचा सणफ या लेखात सांगून पुढे म्हणतात – होळीचा सण जातीने शुद्र आहे एवढयाचसाठी होळीचा कार्यक्रम कोणत्या तरी काळाच्या बिघडलेल्या शुद्रांनी तयार केला आणि त्यांचा हक्क सांभाळण्यासाठी इतर वर्णांनी त्याचा स्विकार केला ? होळीच्या दिवशी अंत्यज्यांना शिवावे असा एक नियम पुराणात आहे. त्याचा उद्देश काय असावा ? द्विज लोक जेवढे संस्कारी म्हणजे संयमी आणि शुद्र तेवढे स्वच्छंदी असे समजूनच होळीमध्ये इतका स्वच्छंद ठेवला आहे काय? होळीच्या दिवशी राजा आणि प्रजा एक होऊन एकमेकांवर रंग उडवितात ते काय निदान वर्षाचे चार–पाच दिवस तरी समानतेचे तत्व अनुभवण्यासाठी? आणि दुसज्या एका ठिकाणी ते म्हणतात, महोळी म्हणजे कामदहनफ वैराग्याची साधना. या विषयाला काव्याचे मोहक स्वरुप दिल्याने तो वाढतो. त्यालाच विभत्स स्वरुप देवून त्याला नागडा–उघडा करुन त्याचे खरे स्वरुप समाजापुढे उभे करुन विषयाविषयी शिशारी उत्पन्न करण्याचा उद्देश तर यात नसेल ? संबंध हिवाळाभर ज्याच्या मोहात आपण सापडलो त्याची फजिती करुन त्याला जाळून टाकुन पश्चातापाची विभूती शरीराला चर्चून वौराग्य धारण करण्याचा उद्देश यात असेल काय? प्राचीन काळाच्या लिंगपूजेची विडंबना तर यात नसेल ?

राज्यातील होळी

होळी–धुळीवंदन सणाला महाराष्ट्रात धामधुम, युवकांचा जल्लोष, मादक द्रव्यांचा सर्रास वापर व आहारी जात या सणाची सणसण समाजात पसरवितांना दिसतात.



होळी–धुळीवंदन वसंतऋतुच्या आगमनाचा व कृषी संस्कृतीचे जतन करणारा सण आहे. मानवी आरोग्यावर होणारे ऋतुचे परिणाम याचा संकेत देणारा सण आहे, निसर्ग आनंदाचा सण आहे.भारताच्या निरनिराळया राज्यात निरनिराळया प्रकारे होळी करतांना दिसतात. परंतू होळी पेटविण्याचा प्रकार सर्वच ठिकाणी सारखाच होत असतो. महाराष्ट्रात शेणाच्या गोवऱ्यांची किंवा लाकडांची होळी करण्याची प्रथा आहे. कोकणपट्टीत सुपारीचे झाड, आंब्याचे किंवा इतर कुठल्याही झाडांचा सोट देवळापूढे रोवून त्यांच्या तळाशी लहान–लहान लाकडे व गवत जाळतात. भारतात इतर प्रदेशाच्या मानाने महाराष्ट्रातील कोकणपट्टीत या सणाला बरेच महत्व आहे. गोव्यात काही ठिकाणी वायंगणी शिमगा म्हणजे चैत्र शुक्ल पक्षात देखील घुमट (एक प्रकारचे मडक्याचे वाद्य) वाजविले जावून जल्लोशात होळी सण साजरा करतांना आढळतात.राजस्थानच्या पश्चिमी सीमावर्ती बाडमेर नगरात होळीचा उत्सव दगडांची फेकाफेक करुन साजरा केला जात असे. परंतू बदलत्या परिस्थितीनुसार नि समाज रचनेनुसार रंग उडविण्याची प्रथा चालू आहे. सुमारे साठ–सत्तर वर्षापूर्वी होळीचा हा रंगीबेरंगी उत्सव बाडमेर नगरात आपलं वैमनस्याने व दुष्मनी दूर ठेवून दगडांच्या फेकाफेकीने सण साजरा केला जातो. दोन गल्लीत नि दलात होणारी दगडफेक प्रेमाची असते. मबंगालमध्ये डोलकालाफ म्हणून हा सण साजरा केला जातो. तर हिंदी भाषीत प्रांतात रंग–गुलाल, टिंगल–टवाळी, थट्टा–मस्करी, विनोद इतर अफलातून गोष्टी या सणात समाविष्ट असतात. नागपूरकर भोसल्यांच्या वाडयात व तसेच पेशवाईत खेळली जाणारी होळी आणि रंगपंचमी तर महाराष्ट्राच्या इतिहासात सुप्रसिध्द आहे. स्वतंत्र भारतात होळीची प्रथा पं. जवाहरलाल नेहरुंनी पण जोपासली व जपली.होळीचा जन्म हिरण्यकश्यपू आणि प्रल्हाद यांच्या संघर्षातून झाला, अशी एक आख्यायिका आहे. श्रीकृष्णाने पूतना नावाच्या राक्षणीचा वध केला तेव्हा पासुनच होळीची प्रथा सुरु झाली असावी, असे म्हटले तर अतिश्योक्ती होणार नाही.पुराणात होळीच्या उत्सवाचे वर्णन आढळते. बुध्दधर्माचा प्रसिध्द ग्रंथ मधम्मपदफ मध्ये होळीचा उल्लेख ममुर्खाची जत्राफ असं केलेलं आहे. मजैमीनीची पूर्वमिमांसाफ या ग्रंथातही एक संपूर्ण अध्याय होळीला वाहिलेला असून हा सण कसा साजरा करावा याचे सविस्तर वर्णन आणि कारणमिमांसा देण्यात आली आहे. महर्षि वात्सयनाने आपल्या मकामसुत्रफ या ग्रंथात सुगंधित द्रव्याच्या संदर्भात होळीचा विचार प्रामुख्याने केला आहे. भारताचा सांस्कृतिक सण म्हणजे होळी! रंग गुलालाची उधळण करणारा. रंगोन्मादानं भारतीय मातीत अंर्तबाहय मस्ती भरणारा. प्रांत, भाषा व धर्माच्या विभिन्न रंगांच्या सरितांना राष्ट्रीय रंगस्थळीच्या त्रिवेणीत एकात्मतेच्या रंगानं प्रवाहित करणारा हा राष्ट्रीय सण. एकमेकांना गुलालानी माखुन आलींगन देवून हा स्नेह द्विगुणीत करण्याची प्रथा आहे.

# अहिल्यादेवीनगरचे उमेदवार खा.सुजय विखे पाटील यांचा विजय निश्चित: लोकनेत्या पंकजाताई मुंडे

**पाथर्डी । प्रतिनिधी**

लोकनेत्या पंकजा मुंडे पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार मोनिका राजळे आणि शिवाजीराव कर्डिले यांनी त्यांचे यथोचित स्वागत केले. लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सध्या सर्वत्र सुरू झाली आहे. या अनुषंगाने आज पंकजा मुंडे अहिल्यादेवीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून त्यांनी भाजपा तथा महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील हेच नगर दक्षिण मधून पुन्हा एकदा बाजी मारतील असे भाष्य केले.

पंकजा मुंडे यांचे काल रात्रीच आगमन झाले असून त्यांनी बुऱ्हानगर येथील शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी मुक्काम केला आणि सकाळी दौऱ्यास सुरुवात केली. यादरम्यान त्यांनी पाथर्डी येथील रॅलीत सहभाग दर्शवून नागरिकांनी केलेल्या जंगी स्वागताचा स्वीकार केला. यावेळी जेसीबीच्या साहाय्याने पुष्पवृष्टी करून नागरिकांनी आपले समर्थन भाजपाच्या या दोन्ही उमेदवारांना दर्शविले. यावेळी त्यांच्यासहित डॉ. सुजय विखे पाटील, मोनिका राजळे आणि शिवाजीराव कर्डिले यांचा क्रेनच्या सहाय्याने मोठा फुलांचा हार घालून स्वागत करण्यात आले. यांनतर त्यांनी पाथर्डी तालुक्यातील विविध गावांमध्ये देखील भेटी दिल्या. तेथेही त्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले की, डॉ. सुजय विखे पाटील यांनी मागील पाच वर्षाचा कालावधी हा विविध विकास कामांमध्ये व्यस्त राहूनच घालवला आहे. निश्चितच त्यांची ही विकासक वाट त्यांना पुन्हा एकदा संसदेत पाठवेल हा मला विश्वास आहे. मागील निवडणूकीच्या काळातही डॉ. सुजय विखेंच्या प्रचारार्थ मी नगर जिल्ह्यात आले होते. यंदाही आले आणि सुजय विखे यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. सुजय दादांचा विजय निश्चित असून लोकांचे त्यांच्यावरील प्रेम हे अतिशय कौतुकास्पद आहे असे स्पष्ट करून यावेळी मी स्वतः महायुतीच्या माध्यमातून उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक लढवत आहे. निश्चितच भारतीय जनता पार्टीच्या वतीने आम्ही सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध राहू असे मत पंकजा मुंडे यांनी बोलताना व्यक्त केले.तसेच त्यांनी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि विविध मान्यवरांच्या समवेत श्री क्षेत्र मोहोटादेवी येथे देखील श्री जगदंबा मातेचे मनोभावे दर्शन घेतले. तसेच उपस्थित सर्वांशी संवाद साधला. याप्रसंगी भाजपाचे समस्त पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भारतातील शेती उद्योग जागतिक पातळीवर प्रथम क्रमांकावर पोहचवू-हर्षवर्धन पाटील

**पुणे (वृत्तसंस्था)**-भारतात शेती व्यवसाय आजही उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय ठेवले आहे. केंद्र सरकारने तयार केलेल्या नवीन शेती धोरणामुळे २०४७ पर्यंत भारतातील शेती उद्योग जागतिक पातळीवर प्रथम क्रमांकावर पोहचू, असा विश्वास नॅशनल फेडरेशन ऑफ को ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीजचे अध्यक्ष आणि पीसीईटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) निगडी येथील पुणे पब्लिक स्कूल (पीबीएस) च्या वतीने 'ग्री वाईस २४' या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हर्षवर्धन पाटील बोलत होते.यावेळी दीपक फर्टिलायझर्स ण्ड पेट्रोकेमिकल्स लि. चे सहयोगी उपाध्यक्ष मनिष गुप्ता, जे. के. सीडसचे व्यवस्थापक किशोर अहिरे, पीबीएसचे प्राचार्य डॉ. गणेश राव, अधिष्ठाता डॉ. मीनाक्षी त्यागी आदी उपस्थित होते.



देशभरातील पाचशे संस्थांमधील ९०० विद्यार्थी, प्रतिनिधी सहभागी झाले.सध्या शेतकरी शेतीमाल उत्पादन करताना रासायनिक खते, कीटकनाशके यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. परंतु याचा विपरित परिणाम पिकांवर होऊन उत्पादन कमी होते. शेतकऱ्यांनी शाश्वत, नैसर्गिक शेती केली आणि एक उद्योग म्हणून याकडे पाहिले तर अधिक उत्पादन आणि चांगला नफा मिळू शकतो असे किशोर अहिरे यांनी सांगितले.भारतात सरासरी ८७ टक्के पाणी शेतीसाठी, अकरा टक्के पाणी दैनंदिन वापरासाठी तर दोन टक्के पाणी औद्योगिक क्षेत्राला वापरले जाते. म्हणजेच शेतीसाठी पाण्याचा सर्वाधिक वापर केला जातो. तसेच रासायनिक खते मोठ्या प्रमाणात वापरली जातात. मात्र त्या प्रमाणात शेतमालाचे उत्पादन होत नाही. पाणी आणि रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचा पोत घसरला आहे. यामधून बाहेर पडण्यासाठी सेंद्रिय शेती करण्यावर भर दिला पाहिजे. माती परीक्षण करून कोणती पिके घ्यावीत याविषयी माहिती घेतली पाहिजे, असे मनिष गुप्ता यांनी सांगितले.भारतात मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादन होते. ऊसापासून साखर निर्मिती केली जाते. जागतिक पातळीवर साखर उत्पादक देश म्हणून भारताची ओळख आहे. परंतु विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात खूप संशोधन होत आहे. विकसित तंत्रज्ञानामुळे साखर उद्योगातही फार मोठे बदल होत आहेत. ऊसाच्या मळी पासून इथेनॉल निर्मिती करून त्याचा वापर जैव इंधन म्हणून तसेच ऊर्जा निर्मितीसाठी होऊ शकतो. पुढील काळात हे नवीन तंत्रज्ञान भारतात आणून ऊर्जा निर्मिती केली जाणार आहे. त्यासाठी सरकारकडून पुढील धोरण आखण्यात येत आहे. ऊर्जा निर्मिती प्रकल्पांमुळे साखर कारखान्यांना ऊर्जितावस्था मिळून ऊर्जा उद्योग म्हणून नवी ओळख निर्माण होईल असे हर्षवर्धन पाटील म्हणाले.

# भारत तोडोचे नारे देणाऱ्याला काँग्रेसकडून उमेदवारी:अकोला पश्चिम पोटनिवडणुकी वरुन दरेकरांचे काँग्रेसवर टीकास्त्र

**मुंबई (वृत्तसंस्था)**-अकोला पोटनिवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार दंगेबाज आहे. काँग्रेसकडून नफरत जोडो अभियान सुरू असून गुन्हेगारीला पाठीशी घालण्याचा धोरण आखण्यात आल्याचा आरोप भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी केला आहे.

दरम्यान प्रवीण दरेकर पुढे बोलताना म्हणाले की, दंगेबाज आणि खंडणीखोर उमेदवार देऊन सामान्य जनतेवर अन्याय करण्याचे काम काँग्रेसकडून करण्यात येत आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.प्रवीण दरेकर म्हणाले की, साजिद खान पठाण यांना जनता त्यांची जागा नक्की दाखवून देईल. जन्मठेप होईल अशा उमेदवाराला दिलेली उमेदवारी काँग्रेस मागे घेईल का असा सवालही दरेकरांनी उपस्थित केला आहे.प्रवीण दरेकर म्हणाले की, गुन्हेगार टिकवा गुन्हेगारी वाढवा अशा प्रकारचे नव धोरण काँग्रेस आणू पाहत आहे. साजिद खान पठाण पठाण हा अकोल्यातील दंगलीचा मुख्य आरोपी आहे. त्यांच्यावर अनेक पोलिस ठाण्यात मोठ्या प्रमाणात गांजा स्वतः जवळ बाळगणे आणि विकणे यासाठी त्यांच्यावर गुन्हा दाखल आहे. तर कोतवाली पोलिस ठाण्यात घातक शस्त्राचा वापर व दंगल घडवण्याचा गुन्हा दाखल आहे.प्रवीण दरेकर म्हणाले की, जन्मठेप होईल अशा प्रकारचे कृत्य घडवण्याचा कृती त्यांनी केली असून




त्यांच्यावर असे अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीचे त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत दाखल आहेत. भारत जोडो यात्रा काढायची आणि भारत तोडोचे नारे देणाऱ्यांना काँग्रेसचे अधिकृत उमेदवारी द्यायची यावरून काँग्रेस खरे रूप समोर आले आले आहे, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

## हुकूमशहा डरपोकच असतो, मोदी घाबरलेत

# म्हणूनच विरोधकांना तुरुंगात टाकून निवडणुकांना सामोरे जाताय, ठाकरे गटाचा हल्लाबोल

**मुंबई (वृत्तसंस्था)**-लोकांनी निवडून दिलेल्या मुख्यमंत्र्यांना अटक करून त्यांना अतिरेक्यासारखे वागवायचे व त्यांची बदनामी करून निवडणुकीतून माघार घ्यायला लावायची. हे करणारे राज्यकर्ते लोकशाहीची जपमाळ ओढतात तेव्हा औरंगजेबाची आठवण येते. औरंगजेबसुद्धा जपमाळ ओढत त्याच्या विरोधकांचे काटे काढीत होता, असा हल्लाबोल ठाकरे गटाकडून भाजप सरकारवर करण्यात आला आहे.

तरीही महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी निर्माण झालेच. ज्याची ज्याची भीती वाटत होती त्या सगळय़ांना कंसाने तुरुंगात डांबले, तरी कृष्णजन्म झाला व कंसाचा वध अखेर झालाच. दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांची अटक धक्कादायक, आश्चर्यकारक नाही. हुकूमशहा डरपोकच असतो. 'एक अकेला सब पर भारी' असे मोदींविषयी म्हणतात ते खरे नाही. मोदी हे घाबरले आहेत. त्यामुळेच विरोधकांना तुरुंगात टाकून निवडणुकांना सामोरे जात आहेत. यालाच डरपोक म्हणतात, असा हल्लाबोल ठाकरे गटाच्या मुखपत्रातून करण्यात आला आहे.भारतीय लोकशाहीचे आणखी काय धिंडवडे निघायचे बाकी आहेत? दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना 'ईडी'ने त्यांच्या सरकारी घरात घुसून अटक केली. केजरीवाल यांच्याकडे दिल्ली विधानसभेत पूर्ण बहुमत आहे. त्यांच्या 'आप' पक्षाचे पंजाबात सरकार आहे, पण लोकसभा निवडणुकीत केजरीवाल यांनी 'इंडिया आघाडी'बरोबर गठबंधन केले. त्यामुळे दिल्ली, हरयाणा राज्यांत भाजपला मोठा फटका बसेल. केजरीवाल यांनी काँग्रेसबरोबर जाऊ नये यासाठी 'ईडी'च्या माध्यमातून दहशत निर्माण केली गेली. केजरीवाल यांनी भाजपसमोर झुकण्यास नकार दिला तेव्हा त्यांच्या सरकारी निवासस्थानात घुसून ईडीने त्यांना अटक केली. मद्य घोटाळा वगैरे सर्व बहाणा आहे. केजरीवाल यांनी काँग्रेसची साथ सोडून भाजपच्या 'वॉशिंग मशीन'शी हातमिळवणी केली असती तर ते अजित पवारांप्रमाणे भाजपचे नवे शंकराचार्य म्हणून नियुक्त झाले असते. या आधी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनाही 'ईडी'ने याच पद्धतीने अटक केली. लोकांनी पूर्ण बहुमताने निवडून दिलेली सरकारे पाडता येत नाहीत तेव्हा 'ईडी' वगैरे यंत्रणेचा वापर करून विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांनाच अटक करायची हे धोरण मोदी-शहांच्या सरकारने स्वीकारले आहे. यालाच



हुकूमशाही म्हणतात. रशिया किंवा चीनसारख्या राष्ट्रांत विरोधकांना सरळ गायब केले जाते किंवा ठार केले जाते. आपल्याकडे लोकशाहीचे अजीर्ण झाल्याने विरोधकांवर खोटे गुन्हे दाखल करून महिनोन् महिने तुरुंगात डांबले जाते. देशात लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत.निवडणुका भयमुक्त वातावरणात पारदर्शक पद्धतीने होतील, असे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे; पण आचारसंहिता लागू झाली असताना निवडणुकीत उतरलेल्या सरकारविरोधकांची अशी मुस्कटदाबी करणे हे कसले लक्षण समजायचे? विरोधकांनी निवडणुकीत उतरूच नये यासाठी सुरू असलेला हा दहशतवाद आहे. औरंगजेब त्याच्या विरोधकांना एक तर मांडलिक करीत होता, नाहीतर यमसदनास पाठवीत होता. हीच औरंगजेबी वृत्ती सध्याच्या केंद्रीय राज्यकारभारात दिसत आहे.केजरीवाल हे राजकीय पक्ष चालवतात व त्यांनी मद्याचे ठेके देण्याच्या बदल्यात देणग्या स्वीकारल्या असा ईडीचा आरोप आहे, पण अशा प्रकारे हजारो कोटींच्या देणग्या भाजपच्या खात्यातदेखील जमा झाल्या आहेत. निवडणूक रोखे घोटाळ्यांनी भाजपचा चेहराच ओरबाडून निघाला. ज्या कंपन्यांवर ईडी, सीबीआयच्या धाडी पडल्या त्या कंपन्यांकडून भाजपने जबरी वसुली करून पक्षाला निधी घेतला. गुन्हेगारी स्वरूपाचा पैसा वळवून घेणे यालाच 'पीएमएलए' कायद्यात मनी लाँडरिंग म्हटले जाते. असे मनी लाँडरिंग भाजपने केले, पण भाजप व त्यांचे वसुली एजंट मोकळे असून केजरीवाल, सिसोदिया, संजय सिंह यांना अटका झाल्या आहेत. २०१४ पासून आतापर्यंत 'ईडी'ने केलेल्या कारवायांकडे नजर टाकली तर ९५ टक्के कारवाया विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच झाल्या आहेत. मोदी-शहांनी सत्ता व तपास यंत्रणांचा केलेला हा गैरवापर आहे. ईडी, सीबीआयचा वापर विरोधकांना संपविण्यासाठी व आपली तिजोरी भरण्यासाठी केला. ही कृती संविधान विरोधी आहे. 'दिल्ली सरकारने मद्य धोरणासंदर्भात जे निर्णय घेतले त्यामुळे त्या सरकारचा २,८७३ कोटींचा तोटा झाला.दक्षिण भारतातील मद्य उद्योजकांना फायदा पोहोचविण्यासाठी १३६ कोटी रुपयांची लायसन्स फी माफ केली व त्या बदल्यात १०० कोटी रुपयांचा निधी स्वीकारला,' असा दावा ईडीने केला आहे. 'ईडी' हा सध्या एक बेभरवशाचा टोणगा झाला आहे व मोदी-शहांनी फटका मारताच ते सांगतील त्याला शिंगावर घेत असतो. भारतातील लोकशाही, स्वातंत्र्य, संविधान त्यामुळे नष्ट झाले आहे. विरोधी आवाज राहूच नये हे विद्यमान राज्यकर्त्यांचे धोरण घातक आहे. लोकशाही पूर्णपणे संपविण्याचा हा कट आहे. मोदी सरकारने सर्वाधिक फायदा त्यांच्या दोन-चार उद्योगपती मित्रांना पोहोचवला आहे.मोदी काळात संपूर्ण देश, सार्वजनिक उपक्रम, मुंबईसारखी शहरे ही अदानीच्या घशात घातली गेली, ती काय मोदी-शहा कर्णाचे अवतार आहेत म्हणून? लोकांनी निवडून दिलेल्या मुख्यमंत्र्यांना अटक करून त्यांना अतिरेक्यासारखे वागवायचे व त्यांची बदनामी करून निवडणुकीतून माघार घ्यायला लावायची. हे करणारे राज्यकर्ते लोकशाहीची जपमाळ ओढतात तेव्हा औरंगजेबाची आठवण येते. औरंगजेबसुद्धा जपमाळ ओढत त्याच्या विरोधकांचे काटे काढीत होता. तरीही महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी निर्माण झालेच. ज्याची ज्याची भीती वाटत होती त्या सगळय़ांना कंसाने तुरुंगात डांबले, तरी कृष्णजन्म झाला व कंसाचा वध अखेर झालाच. दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांची अटक धक्कादायक, आश्चर्यकारक नाही. हुकूमशहा डरपोकच असतो. 'एक अकेला सब पर भारी' असे मोदींविषयी म्हणतात ते खरे नाही. मोदी हे घाबरले आहेत. त्यामुळेच विरोधकांना तुरुंगात टाकून निवडणुकांना सामोरे जात आहेत. यालाच डरपोक म्हणतात.

## स्वस्त प्रचाराच्या मोहात भाजपला टारगेट करू नका

# गुंडगिरी करणाऱ्या पक्षांना आम्ही घरी बसवल-चित्रा वाघ

**मुंबई (वृत्तसंस्था)**-स्वस्त प्रचाराच्या मोहात भाजपला टारगेट करू नका. गुंड पाळणं ही भाजपची संस्कृती नाही. गुंड पाळणाऱ्या पक्षांना आम्ही घरी बसवलंय असे म्हणत भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे. प्रणिती शिंदे यांनी गुरुवारी पंढरपुरात आपल्या वाहनावर हल्ला झाल्याचा दावा केला होता. तसेच हल्ला करणारे भाजपचे लोक होते असा आरोप देखील त्यांनी केला होता. यावरून चित्रा वाघ यांनी जोरदार पलटवार केला आहे. चित्रा वाघ यांनी यासंदर्भात ट्विट केले आहे. त्या म्हणाल्या, ''काही जण निवडणूक जिंकण्यासाठी जनतेपर्यंत जातात आणि त्यांची कामे करतात. काही जणांना शॉर्ट कट मारायचा असतो. ते स्टंट करतात. अशाच आमच्या एका स्टंटबाज भगिनींचा व्हिडिओ फिरवला जातोय. त्या भगिनी म्हणजे आपल्या सोलापूरच्या काँग्रेस आमदार प्रणितीताई शिंदे झालं असं की, कुठून तरी सभेवरून येत असताना ताईंची गाडी अडवण्यात आली. आता आपल्या कामांसाठी जनता लोकप्रतिनिधींकडे जाणार नाही मग कुणाकडे जाणार ? काही समाजबांधवांच्या आपल्या



मागण्यांसंदर्भात तीव्र भावना होत्या. त्या त्यांनी प्रणितीताईंच्या कानावर घातल्या. बिचारे थोडे संतापलेले होते. तेही साहजिक आहे. ही मंडळी काय म्हणताहेत, हे त्या व्हिडिओमधून स्पष्ट दिसतंय. त्यांची नेमकी मागणी काय आहे, तेही समजतंय'', असे चित्रा वाघ यांनी म्हंटले आहे.तसेच ''या लोकांवरच गुरकावून त्या फणकाऱ्यानं गाडीत बसून चालत्या झाल्यात. नंतर त्या आरोप करत सुटल्यात की, भाजपच्या कार्यकर्त्यांनी आपल्यावर हल्ला केला. आपल्यावर हल्ला करणारे भाजपचे गुंड होते. मला स्पष्ट करायचंय की, एक तर ही लोकं भाजपचे कार्यकर्ते तर अजिबातच नव्हते. शिवाय, आपल्या भावना तीव्रपणे व्यक्त केल्या म्हणून जे कुणी ते लोक आहेत, त्यांना गुंड म्हणणे तुमच्यासारख्या लोकप्रतिनिधीला शोभत नाही.प्रणितीताई, तुम्ही माजी मुख्यमंत्र्यांची लेक आहात. आपल्याकडे गाऱ्हाणी घेऊन आलेल्यांच्या समस्या त्यांनी कशा सोडवल्या, हे जरा त्यांना विचारा'', असे चित्रा वाघ यांनी म्हंटले आहे.दरम्यान, चित्रा वाघ यांनी यावेळी प्रणिती शिंदे यांना इशाराही दिला आहे. ''उगीच स्वस्त प्रचाराच्या मोहात गुरफटून भाजपला टारगेट करू नका. गुंड पाळणं ही भाजपची संस्कृती नाही. गुंड पाळणाऱ्या पक्षांना आम्ही घरी बसवलंय. त्यामुळे बेछूट आरोप कराल तर तशाच भाषेत उत्तर देऊ'', असं देखील चित्रा वाघ यांनी म्हटलं आहे.दरम्यान, माझ्याकडे सोसायटी, बँक आणि कारखाना नसल्यानी ईडीबिडीची भिती नाहीये, त्यामुळे मी भाजप विरोधात बोलणारच, असे म्हणत त्यांनी भाजपवर हल्ला चढवला आहे. निवडणूकीच्या तोंडावर २ रुपयांनी पेट्रोलचे भाव कमी करून भाजप लोकांना वेड्यात काढत आहे. तरी पण आपण जर भाजपला मतदान केले तर आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेऊ, असेही त्यांनी म्हटले आहे.

# मी भाजपसोबत जायचे ठरवले, तर मला कोण थांबवू शकतो?-प्रकाश आंबेडकर

**अकोला**-उद्या मी भारतीय जनता पक्षासोबत जायचे ठरवले तर मला कोण थांबवू शकतो? मला शरद पवार थांबणार आहेत? उद्धव ठाकरे थांबवणार आहेत? की राहुल गांधी थांबवणार आहेत? मला कोणी थांबवू शकत नाही, माझ्या पक्षाला कोणी थांबवू शकत नाही. असे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडी सोबत जाण्याच्या प्रश्नाला प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय जनता पक्षाची 'बी टीम' असा आमचा प्रचार केला जातो. मात्र, आम्ही ठरवले तर कोणासोबतही जाऊ शकतो. आम्हाला कोण थांबवणार? असा प्रतिप्रश्न त्यांनी उपस्थित केला.



वंचित बहुजन आघाडी आणि महाविकास आघाडी एकत्रित लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्याची शक्यता आता कमी झाली आहे. वंचित बहुजन आघाडीने २६ तारखेपर्यंत महाविकास आघाडीला वेळ दिला आहे. तोपर्यंत जागा वाटपाचा अंतिम निर्णय घेऊन आमच्याशी चर्चा करा, असे ड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. मात्र, वंचित बहुजन आघाडीमध्ये अजूनही १५ जागांबाबत वाद असल्याचा दावा देखील त्यांनी यावेळी केला. महाविकास आघाडीने बैठका घेतल्या. मात्र, त्या बैठकांना आम्हाला बोलवले गेले नाही. याबाबतच्या बातम्या मीडिया दाखवत नाही. मात्र, आम्ही किती जागा लढवणार? आम्ही किती जागा मागितल्या आहेत? असे प्रश्न आम्हाला विचारत आहे, असा आरोप देखील ड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.मागील अडीच वर्षापासून महाविकास आघाडीतील तीन घटक पक्ष आहेत. मात्र अडीच वर्षांमध्ये ते ४८ जागा वाटून घेऊ शकले नाहीत. त्यांच्यामध्ये १५ जागांवर वाद आहे. हे मीडियाने विचारले का? असा प्रश्न प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे. ज्यावेळी त्यांचे ठरले नाही, तेव्हा तुम्ही आम्हाला का आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहात? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. महाविकास आघाडीचे अंतर्गत ठरलेले नाही. त्याला आम्ही काय करणार? असे देखील ते म्हणाले. प्रकाश आंबेडकर यांनी ज्येष्ठ पत्रकार साहील जोशी यांना मुलाखत दिली. यावेळी त्यांनी सदरील दावा केला आहे. असे वृत्त 'मुंबई तक' ने प्रसिद्ध केले आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# विंजासन रस्त्याच्या पडदीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे, नागरिकांचा आरोप

## आठ दिवसातच बांधकाम फुटले

**भद्रावती । प्रतिनिधी**

शहरातील भद्रनाग मंदिर ते ऐतिहासिक विंजासन बुद्ध लेणी कडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम सुरुवातीपासूनच वादात आहे. हा रस्ता तब्बल एक वर्षानंतर कसाबसा तयार करण्यात आला. या रस्त्याच्या कडेला पेवर ब्लॉक बसविण्यासाठी दोन्ही बाजूला सिमेंटच्या पडद्या बांधण्यात आल्या. मात्र या पडद्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे या पडद्या अनेक ठिकाणी अल्पावधीतच फुटलेल्या आहेत. या बांधकामाकडे संबंधित अधिकाऱ्यांचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याने ठेकेदाराकडून या रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केला जात असल्याचा आरोप या भागातील नागरिकांनी केला आहे. अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात साटेलोटे असल्याचा संशयही येथील नागरिकांनी बोलून दाखविला आहे.सदर रस्ता हा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत तयार



करण्यात येत आहे. सिमेंट कॉंक्रीट चा रस्ता व रस्त्याच्या दोन्ही बाजूला पेवर ब्लॉक असे या रस्त्याचे स्वरूप आहे. हा रस्ता मंजूर झाल्यानंतर तब्बल एक वर्षानंतर या रस्त्याचे बांधकाम ठेकेदाराकडून सुरू करण्यात आले. सुरुवातीपासूनच या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाविषयी अनेक आरोप होत आहे. रस्ता पूर्ण तयार करण्यात आला असला तरी रस्त्यावर मध्ये मध्ये असणारे गॅप योग्य रीतीने भरण्यात न आल्याने नागरिकांना या रस्त्यावरून वाहने चालविणे त्रासदायक होत आहे. पेवर ब्लॉक लावण्यासाठी या रस्त्याच्या दोन्ही बाजूला सिमेंटच्या पडद्या उभारण्यात आल्या. मात्र निकृष्ट कामामुळे या पडद्या आठ दिवसातच अनेक ठिकाणी फुटलेल्या आहे. या रस्त्या बांधकामाच्या सुरुवातीपासूनच रस्त्याच्या दर्जा विषयी अनेक आरोप व तक्रारी होत आहे. मात्र संबंधित अधिकार्याकडून याची दखल घेतली जात नसल्याचे चित्र दिसुन येत आहे.हा रस्ता पुढे वेकोलीची एकता नगर वसाहत, कुणाडा,देऊळवाडा व माजरी गावाकडे जात असल्यामुळे या रस्त्यावर चांगलीच रहदारी असते.शिवाय या रस्त्यावरच एतिहासिक विंजासन बुध्द लेणी असल्याने या रस्त्यावर पर्यटकांच्या वाहणांचिही गर्दी असते.मात्र या रस्त्याच्या दोषपूर्ण बांधकामामुळे या रस्त्यावरुन ये जा करणाऱ्या नागरिकांना अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. या रस्ता बांधकामाची वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करुन योग्य ती चौकशी करावी अशी मागणी या भागातील नागरिक करीत आहे.

# परळी शहरात राखेच्या धुळीमुळे प्रदूषनाच्या प्रमाणात वाढ;शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**परळी**–शहरात धुलीचे प्रमाणात वाढ होत असून पोलीस प्रशासन व नगर पालिकेचे दुर्लक्ष गेल्या अनेक वर्षांपूर्वी पासूनअवैध राख वाहतुकीच्या धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. धुळीच्या प्रदूषनाचे प्रमाण आवाक्याबाहेर गेले आहे. हवेतील धुळीचे प्रमाण दोन ते तीन पट वाढल्याने सर्दी, खोकल्यापासून दम्यापर्यंत अनेक आजाराच्या तक्रारी वाढल्या आहेत शहरातील प्रदुषणाची समस्या हि वैद्यनाथ कॉलेज परिसर शिवाजी चौक एकमिनार चौक ज्या ठिकाणी स्पीड ब्रेकर असतील त्या ठिकाणी अति वेगात वाहतुकीची रहदारी होत असल्यामुळे वाहन आदळून काही भागातील हवेमुळे परिसरातील विद्युत केंद्रातील राख हि अंत्यत धोकादायकरीत्या प्रदूशणाची वाढ झाल्याचे दिसून येत असून नागरिकांना या धुलिमुळे अनेक आजारांना निमंत्रण देणारी हि धूळ वातावरणात भर भरून राहिल्याने धोका प्रचंड वाढला आहे धूलिकणांचे प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ गेल्या अनेक वर्षांपासून झालेली असून जनतेला अवैद्य राख वाहतूक याचा नाहक त्रास सहन करावा लागत असून यातून शहरातील नागरिकांना या त्रासाला सामोरे जावे लागत आहे, रोडवर ढिगारे जागोजाग पडलेले दिसत आहेत.या कडे नगरपालिके व पोलीस प्रशासना चे दुर्लक्ष होत आहे शाम मुखर्जी उड्डाण पुलावर आज चार ते पाच दिवस झाले टँकर पलटून राख पडलेली आहे.यावरून कार ट्रक बस यावरून वाहन गेले असता हि धूळ शहरात पसरत आहे,

यामुळे हवेतील प्रदूषण वाढले आहे. वाहनांची संख्या वाढली आहे. धूळ किंवा सूक्ष्म धूलिकणांमुळे होत असलेल्या त्रासामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न वाढला आहे. दवाखान्यात रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. धूळ श्वासावाटे शरीरात जाते. धूलिकण फुफ्फुसात जमा होतात. ॲलर्जीचा त्रास असणा–यांना सर्दी, खोकला, कफ होणे, धाप लागणे असे त्रास होतात, तर काहींना सर्दी, खोकला आणि घशात दुखणे असे त्रास होत आहेत. या धूलिकणांचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसनाची क्षमता कमी होणे, यातून अनेक आजार निर्माण होण्याची शक्यता नकारता येत नाही,ढिगारे हटवणे, तेथील राखेवर पाणी टाकून धूळ उडू न देणे यासारखे उपाय केले पाहिजेत. नसता परळी शहर वासियांची आजाराची स्थिती गंभीर होईल. मोठ्या प्रमाणावर धूळ निर्माण झाली असल्यामुळे हे धूलिकण बराच काळ वातावरणात राहतात. हे धूलिकण श्वसनातून शरीरात, फुफ्फुसात, श्वासनलिकेत जातात. यामुळे ही श्वास घेताना हे खूप धोकादायक असते याचे दुष्परिणाम तत्कालिक आणि दीर्घकालीन आहेत, याचा पोलीस प्रशासन आणि नगर पालिका यांनी लक्ष घालून यांचा बंदोबस्त करावा असे परळी शहर वासियांचे म्हणणे असून तात्काळ अवैद्य वाहतूक बंद करण्यात यावी.

# गरीब कुटुंबाचे चार वर्षांपासून घरकुल अपूर्णावस्थेत

## नांदेड येथील प्रकार; ठेकेदाराचा गलथानपणा कारणीभूत

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत एका गरीब कुटुंबास घरकुल मंजूर झाले.मात्र परिस्थिती हलाखीची असल्यामुळे आणि रोजी–रोटी साठी नेहमी बाहेर जावे लागत असल्याने गावातील माजी सरपंच असलेल्या ठेकेदारांनी घरकुल बांधून देण्याचे आश्वासन देत काम हाती घेतले.मात्र आजघडीला ४ वर्ष होऊन गेले.पण घरकुल पूर्ण करण्यात आले नसल्याची बाब उघडकीस आली आहे.नागभीड तालुक्यातील नांदेड येथील हा प्रकार असून घरकुल लाभार्थ्याचे नाव प्रेमदास संपत मेंढूळकर असे आहे.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत



सन – २०१९ मध्ये प्रेमदास मेंढूळकर यांना घरकुल मंजूर झाले.ग्रामपंचायत मध्ये संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता केली.आणि गावातीलच ठेकेदारीत घरकुल बांधण्याचे काम करणारे सत्तार शेख यांनी वेळीच घरकुल बांधण्याचे आश्वासन देत मेंढूळकर यांच्या घरकुलाचे काम हातात घेतले. आणि कामाला प्रत्यक्ष सुरुवात केली.प्रथम २०,४५ नंतर ४५ हजार अशा तीन धनादेशांची १लाख १० हजार रुपयांची रक्कम त्यांना काढून दिली.आणि त्यांनी घराचा पिंजरा एका दमात तयार केला.मात्र त्यानंतर सलग ४ वर्ष होऊन गेले.परंतु घरकुल पूर्ण करण्यात आले नाही.घराचे दरवाजे,खिडक्या,भिंतींचे प्लास्टर,(आतून-बाहेरून) फ्लोरिंग,संडास वगैरे साऱ्या बाबी अजूनही अपूर्णावस्थेतच आहेत. शेवटची उर्वरित रक्कम द्यायला केव्हाही तयार आहे.मात्र घरकुलाचे काम पूर्ण करून देण्यासाठी होकार देता–देता ४ वर्ष निघून गेल्याची माहिती मेंढूळकर यांनी केविलवाण्या स्वरात सांगितली.दरम्यान संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बाबीची दखल घ्यावी.व गरीब कुटुंबाला न्याय द्यावा.अशी मागणी घरकुल लाभार्थ्यांनी केली आहे.

चार वर्षात वारंवार विनवणी करूनही घरकुलाचे काम पूर्ण करून न दिल्याने ग्रामपंचायत व तंटामुक्त समितीकडे तक्रार दाखल केली.दरम्यान त्यांच्या समोर ठेकेदार शेख यांनी ३ दिवसात काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते.मात्र अजूनही घरकुल आहे त्याच स्थितीत आहे.

**– प्रेमदास संपत मेंढूळकर,घरकुल लाभार्थी, रा.नांदेड ता.नागभीड**

**गैरहजेरीत केले स्लॅबचे काम.**

घरकुल लाभार्थी रोजी–रोटी साठी बाहेरगावी कामाला कुटुंबासह गेले असताना त्यांच्या गैरहजेरीत घरकुलाचे स्लॅब टाकण्यात आले.त्यात बिम सुद्धा टाकण्यात आले नाही. पावसाळ्यात स्लॅब मधून सतत पाणी गळत असते.असे कमकुवत बांधकाम करून देण्यात आल्याची खंत मेंढूळकर यांच्या पत्नी कविता यांनी 'सह्याद्रीचा राखणदार ' शी बोलताना व्यक्त केली.

# फडणवीसांचे कट्टर समर्थक नरेंद्र पाटलांचा साताऱ्याच्या जागेवर दावा

## दिल्लीत ताटकळलेल्या उदयनराजेंना धक्का?

**दिल्ली (वृत्तसंस्था)**–सातारा लोकसभेसाठी उमेदवारी मिळावी, यासाठी राज्यसभेचे खासदार उदयनराजे यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. अमित शहांना गळ घालण्यासाठी उदयनराजे दिल्लीदरबारी जाऊन बसले आहेत. सलग तीन दिवसांपासून दिल्लीत ठाण मांडून असतानाही अमित शाह यांनी अद्याप त्यांना भेट दिलेली नाही. दुसरीकडे काही वेळांपूर्वीच उदयनराजेंची देवेंद्र फडणवीसांनी दिल्लीतील निवासस्थानी भेट घेतली. पण आता भाजपाचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय समजले जाणारे नरेंद्र पाटील यांनी साताऱ्याच्या उमेदवारीवर दावा केला आहे. भाजपने मला साताऱ्यात संधी द्यावी, अशी मागणीच त्यांनी केली आहे. त्यामुळे उदयनराजेंना साताऱ्यातून धक्का बसणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.सातारा लोकसभेबाबत नरेंद्र पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सातारा जिल्ह्यात छत्रपती उदयनराजेंसमोर लढायला कुणीच उमेदवार तयार नव्हता. पण भाजपाने मला शिवसेनेत जाऊन निवडणूक लढविण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे मी शिवसेनेतून निवडणूक लढलो आणि मला साडे चार लाखांच्यावर मते मिळाली. छत्रपती उदयनराजेंनाही तेवढ्याच प्रमाणात मते मिळाली होती. आमच्या दोघांच्या मतांमध्ये फक्त ३० ते ३५ हजारांचा फरक होता.नरेंद्र पाटील पुढे म्हणाले, आजही माझा दावा आहे की, भाजपाने कमळ या चिन्हावर सातारा लोकसभा निवडणूक लढविण्याची संधी मला द्यावी. माझं ग्रामीण भागात चांगलं काम आहे. कार्यकर्त्यांसाठी मी संबंध महाराष्ट्रात फिरत असतो. सातारा लोकसभा मतदार संघात माझी चांगली पकड आहे, त्यामुळे यावेळी भाजपने मला संधी द्यावी. त्यामुळे माझे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंग्रशेखर बावनकुळे मला संधी देतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून मुल येथील निवडणूक व्यवस्थेची पाहणी

## स्ट्राँग रुम व चांदापूर फाटावरील निगराणी पथकाला भेट



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून जिल्हा प्रशासनाने सर्वत्र निवडणूक यंत्रणा सज्ज ठेवली आहे. या व्यवस्थेची पाहणी करण्याकरीता जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी शनिवारी मूल येथील स्ट्राँग रुम तसेच गडचिरोली सीमेवर असलेल्या चांदापूर फाटारील स्थायी निगराणी पथकाला (एस.एस.टी) भेट दिली. १३ – चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक १९ एप्रिल २०२४ रोजी होत आहे. यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज आहेत. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात निवडणुकीसंदर्भात चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी बल्लारपूर विधानसभा क्षेत्रांतर्गत येत असलेल्या मुल येथील उपविभागीय कार्यालयातील स्ट्राँग रुमची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी मुलचे उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार मृदूला मोरे (मुल), प्रियदर्शनी बोरकर (बल्लारपूर), मुलचे उपविभागीय पोलिस अधिकारी एस. एस. भगत, पोलिस निरीक्षक सुमीत परतेकी व इतर अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, अंतर्गत भागात वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या मतदान केंद्राची यादी तयार करून या केंद्रावरील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व कर्मचारी यांना वन्यप्राण्यांकडून कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अशा मतदान केंद्राबाबत वन विभागाशी समन्वय साधून १८ आणि १९ एप्रिल या दोन दिवशी वन विभागाचा कर्मचारी तैनात ठेवावा. सोबत पोलिसांचेही सहकार्य घ्यावे. लगतच्या गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी असून चंद्रपूर येथून या मार्गाद्वारे गडचिरोलीत दारु वाहतूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी पोलिस विभागाने चोख बंदोबस्त ठेवून कारवाई करावी.पुढे ते म्हणाले, निवडणुकीच्या कामात ड्युटी लावण्यात आलेल्या अधिकारी – कर्मचा-यांचे मतदान कोणत्या क्षेत्रात येते, याबाबत माहिती अपडेट ठेवा. पोस्टल बॅलेट संदर्भात त्यांच्याकडून अर्ज भरून घ्यावा. पोलिस विभागालासुध्दा अशा प्रशिक्षणावेळी आमंत्रित करावे, जेणेकरून मतदानाच्या दिवशी किंवा इतर वेळी कायदा – सुव्यवस्थेसंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्या तर, त्याचे वेळीच निराकरण व्हावे. मतदान प्रक्रियेदरम्यान नियुक्त करण्यात आलेल्या सेक्टर अधिका–यांसुध्दा वेळेवर उद्भवणा–या अडचणीवर मात करण्याबाबत प्रशिक्षण द्यावे, अशा सुचना जिल्हाधिका–यांनी दिल्या.स्ट्राँग रुम व स्थायी निगराणी पथकाची पाहणी : यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी मुल उपविभागीय अधिकारी कार्यालयातील स्ट्राँग रुम, साहित्य पुरवठा कक्ष, आदर्श आचारसंहिता व तक्रार निवारण कक्ष, परिसरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही आदींची पाहणी केली. तसेच चामोर्शी – गोंडपिपरी – सावली मार्गावर चांदापूर फाटा येथे स्थापन करण्यात आलेल्या स्थायी निगराणी पथकाला भेट देऊन अधिकारी – कर्मचा–यांची उपस्थिती तपासली व सुचना दिल्या.

# युकेचे राजकीय आणि द्विपक्षीय वार्ताकार जॉन एम निकेल यांनी घेतली अम्मा का टिफीन उपक्रमाची भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अम्मा का टिफिन हा उपक्रम आता राज्यभर चर्चेला जात असतांना आज युनायटेड किंगडम सरकारचे फॉरेन, कॉमनवेल्थ आणि डेव्हलपमेंट ऑफिस एशिया पॅसिफिकचे राजकीय आणि द्विपक्षीय वार्ताकार प्रमुख जॉन एम निकेल यांनी आज अम्मा का टिफिन उपक्रमाची भेट घेत उपक्रमाचे कौतुक केले आहे. यावेळी गंगुबाई ऊर्फ अम्मा, आमदार किशोर जोरगेवार, राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार सुभाष धोटे, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते सुभाष गौर, कल्याणी किशोर जोरगेवार, श्री महाकाली माता महोत्सव समितीचे कोष्याध्यक्ष पवन सराफ, ॲड. दीपक चटप यांची उपस्थिती होती.

अम्मा यांच्या सुचनेनंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरात अम्मा का टिफिन हा उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमाचा



तिसरा वर्ष सुरु आहे. या उपक्रमाअंतर्गत शहरातील गरिब गरजूंना दररोज घरपोच जेवणाचा टिफिन पोहचविला जात आहे. आता या उप्रकमाची राज्यभर चर्चा असुन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नुकतीच या उपक्रमाला भेट देत कौतुक केले आहे. तर या अगोदर अनेक मोठ्या नेत्यांनी व विविध सामाजिक संघटनांनी या उपक्रमाला भेट दिली आहे. अम्माने सुरु केलेल्या या उपक्रमा बदल अनेक संस्थाच्या वतीने अम्माला पुरस्कृत करण्यात आले आहे.

दरम्यान आज युनायटेड किंगडम सरकारचे फॉरेन, कॉमनवेल्थ आणि डेव्हलपमेंट ऑफिस एशिया पॅसिफिकचे राजकीय आणि द्विपक्षीय वार्ताकार जॉन एम निकेल यांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी पोहचत सदर उपक्रमाला भेट दिली. यावेळी त्यांनी अम्माचे कार्य प्रेरणादाई असल्याचे म्हटले आहे. भारत हा सेवेकरी देश आहे. या देशाकडून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहे. चंद्रपूर हे सुंदर शहर आहे. येथे येण्याचा योग आला आणि या सेवेच्या उपक्रमाला भेट देता आल्याचा आनंद असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. अम्माच्या टिफिन उपक्रमाबाबत संपूर्ण माहिती यावेळी त्यांनी जाणून घेतली. उपक्रम राबविणे सहज आहे. मात्र आपण त्यात सातत्य ठेवले हे कौतुकास्पद असल्याचे ते यावेळी म्हणाले. या प्रसंगी अम्मा का टिफिन उपक्रमाची संपुर्ण चमू उपस्थित होती.

# मला बँका लोन देत नाहीत;अनेक अडचणींचा सामना करावा लागतोय

## बारामतीत रोहित पवार यांनी व्यक्त केली खंत

**बारामती (वृत्तसंस्था)**–आज मला बँका लोन देत नाहीत. अनेक अडचणींचा सामना करावा लागतोय अशी भावना राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी बोलून दाखवली. तसेच आज मी जो काही आहे त्यात सर्वात मोठा वाटा हा शरद पवार आणि अजित पवार यांचा आहे असेही ते म्हणाले. बारामतीमध्ये झालेल्या सभेत रोहित पवार बोलत होते. यावेळी त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले.

सध्या त्यांच्यावर सुरू असलेल्या कारवाईवरून त्यांनी खदखद व्यक्त केली. ''आज काही जण म्हणत आहेत मी काय संघर्ष केला. मला सत्तेत जाणं सोपं होते, पण मी गेलो नाही. माझा व्यवसाय अडचणीत होता तो मी बाहेर काढला. आज मला बँका लोन देत नाहीत. अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. भूमिका बदलायची नसते'', असे रोहित पवार म्हणाले.तसेच ''आज दुधाचे दर कमी झाले आहेत. शरद पवार ज्यावेळी सत्तेत होते त्यावेळी मार्ग काढायचे. परिस्थिती कोणतीही ही असली तरी शरद पवार मार्ग काढतात. त्यांनी बारामतीचा विकास केला म्हणून बारामती पुढे गेली. त्यांचा स्वभाव बदलला नाही, ते होते तसेच आहेत. जसे बोलले तसे वागले. त्यांनी कधीही भेदभाव केला नाही'', असे रोहित पवार म्हणाले.आज राज्यात राजकीय परिस्थिती पाहता शरद पवारांसोबत जनता आहे. सर्वात जास्त खासदार महाविकास आघडीचे निवडून येणार आहेत. तसेच २०२४ ला राज्यात महाविकास आघडीची सत्ता येणार असा दावाही रोहित पवार यांनी केला. तसेच सुप्रिया सुळे जनतेच्या अडचणी समजून घेऊन संसदेत मांडतात. त्यांनी काही विषय मांडल्याने ब्रेक लागला असेही रोहित पवार म्हणाले.तसेच त्यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना झालेल्या अटकेवरून देखील सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल केला आहे. कालची केजरीवाल यांची अटक ही ट्रेलर आहे. २०२४ नंतर संविधान, लोकशाही राहणार नाही. त्यामुळे आपल्या हितासाठी शिक्षित, अभ्यासू खासदार निवडून यायला हवेत. त्यामुळे सुप्रिया सुळेंच्या पाठीशी सर्वांनी उभे राहावे असे आवाहन देखील रोहित पवार यांनी बारामतीकरांना केले आहे.तसेच ''चंद्रकांत पाटील बारामतीत आले होते साहेबांवर बोलले. भाजपाला शरद पवार यांना संपवायचे आहे. भाजप नेत्यांना बोलायच्या आधी परवानगी घ्यावी लागते. आपल्या सोबत असताना प्रेस कॉन्फरन्स कोण गाजवत होत ? आता तिकडे गेल्यावर त्यांना किती वेळ बोलायला मिळतं? कुटुंबातील सदस्य म्हणून वाईट वाटतं'', असेही रोहित पवार म्हणाले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .